

घड्याळ म्हंटल की..
विठ्ठल वॉच
नामवंत कंपन्यांची घड्याळे
मिळतील विक्री व दुरूस्ती
सुधाकर कॉम्पलेक्स,नगरपलिकेसमोर
मायणी रोड,विटा (जि.सांगली)
८२६२८३५३९१-९४२१२२१६३०



# प्रीतिसंगम

www.pritisangam.com

सातारा-सांगली-कोल्हापूर-पुणे-सोलापूर



छोटी जाहिरात मोठा प्रतिसाद
दैनिक प्रीतिसंगममध्ये छोट्या जाहिराती प्रसिद्धीसाठी देवून सहकार्य करा..
संपर्क
कराड-२२७७२५/७३५०६४२३९४
सातारा कार्यालय-९२२६३९८८१७



वर्ष २९ वे | अंक ३५६ | पाने ४ | शनिवार | दि. ७ फेब्रुवारी २०२६ | किंमत २ रूपये | R.N.I.No.MAHMAR./2001/10338 पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 | फोन-२२७७२५


# मिनी मंत्रालयासाठी आज मतदान

## शासकीय यंत्रणा सज्ज:६५ गट आणि १३० गणांसाठी २८७७ मतदान केंद्रे

**सातारा/प्रतिनिधी:–**

सातारा जिल्हा परिषदेसाठी आज जिल्ह्यात ६५ गटासाठी आणि १३० गणांसाठी मतदान प्रक्रिया होत असून शासकीय यंत्रणा सज्ज झाली आहे. २८७७ मतदान केंद्रांवर मतदानासाठी शासकीय कर्मचारी एस.टी. बसेस मधून रवाना झाले आहेत. आज शनिवाद दि.०७ रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ५.३० या वेळेमध्ये मतदान प्रक्रिया पार पडत आहे. अटी तटीच्या या लढतीमध्ये मतदाना टक्का वाढवण्यासाठी सर्व शासकीय यंत्रणा व उमेदवार प्रयत्न करताना दिसत आहेत. जिल्ह्यात २ लाख ९४ हजार ११० मतदार मतदान करणार आहेत. ही प्रक्रिया जिल्ह्यातील ११ तालुक्यात पार पडणार आहे. मतदान प्रक्रियेवेळी कोणताही अणुचीत प्रकार घडूनये म्हणून मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. ६२८ उमेदवारांचे भवितव्य ठरवणारी ही मतदान प्रक्रिया पार पडत आहे.



सातारा जिल्हा परिषदेच्या ६५ गट आणि १३० गणासाठी शनिवार दिनांक सात रोजी प्रत्यक्ष मतदान होणार असून जिल्ह्यातील २८७ मतदान केंद्रांवर २१ लाख ९४ हजार ११० मतदार मतदान करणार आहेत .ही प्रक्रिया सकाळी साडेसात वाजल्यापासूनसातारा जिल्ह्याच्या अकरा तालुक्यातून सकाळी साडेसात वाजल्यापासून सुरू होणार आहे .खंडाळा तालुक्यातील ९८ हजार २९१ फलटण तालुक्यातील दोन लाख ५३ हजार २२७ मान तालुक्यातील एक लाख ७५ हजार ४५१ खटाव तालुक्यातील दोन लाख ४० हजार १६९ कोरेगाव तालुक्यातील एक लाख ९८ हजार ७६८ वाई तालुक्यातील एक लाख३९,४३३ महाबळेश्वर तालुक्यातील ३६२५७ जावळी तालुक्यातील ९२ हजार एक सातारा तालुक्यातील दोन लाख ८० हजार ३५१ पाटण तालुक्यातील दोन लाख ७३५६ कराड तालुक्यातील ४,६,६०६ असे एकूण २१ लाख ९४ हजार ११० मतदार मतदानाचा



जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी मतदान होत असून मतदानाचे साहित्य घेवून शासकीय कर्मचारी तर दुसऱ्या छायाचित्रात साहित्य घेण्यासाठी झालेली गर्दी. छाया–अस्लम मुल्ला.




# सांगलीत जिल्ह्यात आज मतदान

## जिल्हा प्रशासन सज्ज;खासदार,आमदारांची प्रतिष्ठा पणाला

**सांगली/प्रतिनिधी:–**

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठीच्या प्रचारासाठी गुरुवार दि. ५ रोजी जाहीर प्रचाराची सांगता झाली. मागील आठ दिवसांपासून खासदार, आमदारांसह लोकप्रतिनिधी, उमेदवार, कार्यकर्त्यांनी पायाला भिंगरी बांधून तालुके, मतदारसंघ पिंजून काढला आहे. पदयात्रा, रैली, जाहीर सभांनी गुरुवारी संध्याकाळी प्रचाराच्या तोफा थंडावल्या. या निवडणुकीत विविध पक्षांचे आजी–माजी खासदार, आमदार, लोकप्रतिनिधींची प्रतिष्ठा पणाला लागली आहे.

जिल्हा परिषदेचे ६१ गट आणि पंचायत समितीच्या १२२ गणासाठी शनिवार दि. ७ रोजी मतदान होणार आहे. तर सोमवार दि. ९ रोजी




मतमोजणी होणार आहे. निवडणुकीसाठी जिल्हा प्रशासनाची यंत्रणा पूर्णपणे सज्ज झाली आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती मतदानासाठी जिल्ह्यात २०३९ मतदान केंद्रे घोषित केली असून या मतदान केंद्रावर मतदान पार पडणार आहे.

या मतदान केंद्रामध्ये आटपाडी तालुक्यात १५२, जत २९२, खानापूर १३०, कडेगाव – १४८, तासगाव २०१, कवठेमहांकाळ – १३०, पलूस १२९, वाळवा ३६०, शिराळा १७१ आणि मिरज तालुक्यात ३२६ मतदान केंद्रांचा समावेश आहे. तर १८ लाख १८ हजार ७४२ मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी शेवटच्या टप्यात राजकीय वातावरण चांगलेच तापले. प्रचाराच्या शेवटच्या दिवशी पालकमंत्र्यांसह काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, शिवसेनेच्या आमदारांच्या तालुक्यात ठिकठिकाणी सभा झाल्या. एकमेकांवर टीकेची झोड उठवली. आपापल्या भागात वर्चस्व सिद्ध करण्यासाठी सर्वच पक्षांचे आजी–माजी खासदार, आमदार, लोकप्रतिनिधींनी प्रचार यंत्रणा जोरदार राबवली आहे.

जिल्हा परिषदेच्या ६१ जागांसाठी २११ तर पंचायत समितीच्या १२२ गणात ३४० उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. शनिवार दि. ७ रोजी सकाळी ७ ते सायंकाळी साडेपाच या वेळेत मतदान प्रक्रि या पार पडणार आहेत. जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीसाठी भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, शिवसेना आदी सर्वच पक्ष निवडणूक लढवत आहेत. जिल्हा परिषदेच्या ६१ गटासाठी भाजपने सर्वाधिक ५० जागांवर उमेदवार दिले आहेत. काँग्रेसने २५ जागांवर उमेदवार उभे केले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसने ३१, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने ३२, शिवसेना ३२, जनसुराज्य शक्तीने ६, तर रयत क्रांती संघटना आणि शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून प्रत्येकी

# कोल्हापूर मनपात ‘महिलाराज’ कायम

## महापौरपदी महायुतीच्या रुपाराणी निकम तर उपमहापौरपदी अक्षय जरग

**कोल्हापूर/प्रतिनिधी:–**

कोल्हापूर महानगरपालिकेच्या महापौरपदी भाजपच्या रूपाराणी संग्रामसिंह निकम यांची तर उपमहापौरपदी जनसुराज्य शक्ती पक्षाचे अक्षय विक्रम जरग यांची बहुमताने निवड करण्यात आली. या निवडीमुळे कोल्हापूरच्या इतिहासात प्रथमच महायुतीची सत्ता स्थापन झाली आहे. पीठासन अधिकारी तथा जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या महापौरपदाच्या निवडणुकीत रूपाराणी निकम यांना ४६ मते मिळाली, तर काँग्रेसचे उमेदवार सचिन मारुती शेंडे यांना ३५ मते मिळाली. त्यामुळे बहुमताच्या जोरावर रूपाराणी निकम यांची महापौरपदी निवड झाल्याचे घोषित करण्यात आले.

उपमहापौरपदाच्या निवडणुकीत महायुतीतील घटक पक्ष असलेल्या जनसुराज्य शक्ती पक्षाचे अक्षय विक्रम जरग यांनी काँग्रेसचे दुर्वास परशुराम कदम यांचा पराभव केला. या निवडणुकीत जरग यांना ४६ तर कदम यांना ३५ मते मिळाली. रुपाराणी निकम आणि



अक्षय जरग यांच्या विजयानंतर त्यांच्या समर्थकांनी वाद्यांच्या गजरात, गुलालाची उधळण करत आणि फटाक्यांची आतषबाजी करत जल्लोष साजरा केला. उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकात पाटील यांनी चार दिवसांपूर्वी निकम यांच्या नावाची घोषणा केली होती. दुसरीकडे, कोल्हापुरात कोणत्याही स्थितीत शिवसेना शिंदे गटाचा महापौर झाला पाहिजे यासाठी आमदार राजेश क्षीरसागर यांनी बॅनरबाजी केली होती. त्यामुळे महापौरपदावरून चांगलीच रस्सीखेच रंगली होती. मात्र, भाजपकडून रुपाराणी निकम यांना संधी देण्यात आली. त्यांचा कार्यकाळ सव्वा वर्षाचा असणार आहे. त्यामुळे पहिल्यांदाच कोल्हापूर महानगरपालिकेवर महायुतीचा झेंडा फडकला.

रुपाराणी निकम या भाजपच्या तिकिटावर विजयी झाल्या आहेत. त्यांनी प्रभाग क्रमांक १८ मधून निवडणूक लढवताना काँग्रेसचे माजी नगरसेवक भुपाल शेटे यांचा पराभव केला होता. भुपाल शेटे यांचा पराभव आमदार सतेज पाटील यांनाही चटका लावणारा होता. रुपाराणी निकम या महाडिक गटाच्या निकटवर्तीय आहेत. उच्चशिक्षित ही त्यांच्या जमेची बाजू आहे.

दरम्यान, कोल्हापूर महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये महायुतीला काठावरचं बहुमत मिळालं आहे. कोल्हापूरमध्ये महायुतीविरुद्ध काँग्रेसचे विधान परिषदेतील गटनेते तथा कोल्हापूर काँग्रेस जिल्हाध्यक्ष आमदार सतेज पाटील यांच्यात थेट लढत होती. मात्र, पाटील यांनी एकहाती मैदान मारताना तब्बल ३४ जागा निवडून आणल्या आहेत. शिवसेना ठाकरे गटाला केवळ एक जागा मिळाल्याने केवळ ६ जागांमुळे कोल्हापूरची महापालिका सतेज पाटील यांच्या हातून निसटली. कोल्हापूरमध्ये काँग्रेस सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. काँग्रेसच्या खात्यामध्ये ३४ जागा आहेत. भाजपच्या खात्यामध्ये २६ जागा आहेत. शिवसेना शिंदे गट १५ जागांवर राहिला. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला ४ जागा मिळाल्या. जनसुराज्यने एक जागा जिंकली. कोल्हापुरात शरद पवारांच्या राष्ट्रवादीची पाटी कोरी राहिली. काँग्रेसने ८१ पैकी ७५ जागांवर उमेदवार होते. यामध्ये काँग्रेसचे ३४ उमेदवार विजयी झाले. शिवसेना ठाकरे गटाचा केवळ एक उमेदवार विजयी झाला. दुसरीकडे महायुतीमध्ये भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला.

# बाळासाहेब चोरेकर यांना मारहाण

## उंब्रज पोलीस ठाण्यात परस्पर विरोधी अदखलपात्र तक्रारी दाखल

**उंब्रज/प्रतिनिधी:–**

लोकनेते बाबासाहेब चोरेकर यांचे पुतणे बाळासाहेब साळुंखे चोरेकर यांना मारहाण झाल्याची घटना पाल जिल्हा परिषद मतदार संघातील जंगलवाडी ते साखरवाडी रस्त्याच्या दरम्यान शुक्रवारी सकाळी ९ वाजनेच्या सुमारास घडल्याने एकच खळबळ उडाली आहे. घटनेनंतर दोन्ही गटांनी उंब्रज पोलीस ठाण्यात धाव घेतल्याने मोठ्या प्रमाणावर पोलीस ठाण्याच्या आवारात गर्दी निर्माण झाली होती. पोलिसांनी परस्पर विरोधी अदखलपात्र तक्रारी दाखल करून घेतल्या असून राजकीय कारणातून ही घटना घडल्याचे सांगण्यात आले.

याबाबत उंब्रज पोलीस व घटनास्थळावरुन मिळालेली माहिती अशी की, जिल्हापरिषद निवडणूक काळात निर्माण झालेल्या राजकीय कारणावरून चोरे (ता. कराड) लगतच्या साखरवाडी परिसरात दोन गटांत वाद झाल्याची घटना घडली. या प्रकरणी दोन्ही बाजूंनी परस्परविरोधी तक्रारी दाखल



करण्यात आल्या असून उंब्रज पोलीस ठाण्यात दोन्ही बाजुंकडून अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत एका तक्रारीत बाळासाहेब वसंतराव साळुंखे रा. चोरे ता. कराड यांनी नमूद केले आहे की, निवडणुकीच्या भेटीगाठी सुरू असताना या कारणावरून झालेल्या वादा दरम्यान समोरच्या गटातील व्यक्तींनी त्यांच्याशी शिवीगाळ केली तसेच दमदाटी केल्याचा प्रकार घडला. हाताने किरकोळ मारहाण केली. तर दुसऱ्या तक्रारीत विश्वासराव निवृत्ती काळभोर यांनी म्हटले आहे की, जिल्हापरिषद निवडणूक सुरू असून काही कारणाने राजकीय वादातून समोरच्या बाजूकडून त्यांच्या विरोधात अपशब्द वापरण्यात आले तसेच शाब्दिक वाद झाला. यातून किरकोळ मारहाण केली.

घटनेची माहिती मिळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक रविंद्र भोरे यांच्यासह पोलिसांनी घटनास्थळी जाऊन परिस्थितीची पाहणी केली. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेत तणाव वाढू नये यासाठी पोलिसांनी योग्य ती खबरदारी घेतली. दोन्ही फिर्यादींच्या तक्रारी नोंदवून कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे.सदर घटनेबाबत पोलिसांकडून परिस्थितीवर लक्ष ठेवण्यात येत असून पुढील कार्यवाही कायद्यानुसार करण्यात येत असल्याचे सांगण्यात आले.

### आपले मत..

सवय असे काहींना
रेटायचे आपले मत
हट्ट असतो सर्वांनी
व्हावे संपूर्ण सहमत
आगंतुक अनाठायी
बसलेनाक खुपसत
रिकामटेकडे नाकर्ते
असे भरपूर फुरसत
कैकवेळ सर्वांसमोर
असे झाली फसगत
सर्वाधिकार आपणां
करू पाहते हस्तगत
सुखानंदानेसजवली
बसली जाहीर पंगत
आमची भिन्न बैठक
हो विक्षिप्त विसंगत
एकसूर मैफिलीतला
भैरवी आलेली रंगत
एकसुरी वागतोयं मी
जमलेलेगीत दुभंगत
लावून तोरणेपताका
स्वतास्वताचे स्वागत
कुणी नसू दे बोलवत
हजर रहायचे बेमुर्वत
स्वकेंद्रित स्वता मध्ये
चाललोसहज हरवत
टेंभा आपलाउजळत
बसतो मात्र फिरवत

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# आज मतदान;शासकीय यंत्रणा सज्ज

## ४८६ पथकांतील कर्मचारी मतदान केंद्रांकडे रवाना

**कराड/प्रतिनिधी:–**

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील प्रचाराच्या तोफा थंडावल्या असून, आज शनिवारी (दि. ७) प्रत्यक्ष मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. शांततापूर्ण, पारदर्शक व निर्भय वातावरणात मतदान पार पाडण्यासाठी प्रशासनाने सर्व तयारी पूर्ण केली असून, शुक्रवारी मतदान कर्मचारी आपापल्या मतदान केंद्रांकडे रवाना झाले.

कराड तालुक्यातील एकूण ४८६ मतदान पथकांतील कर्मचारी निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रांताधिकारी अतुल म्हेत्रे यांच्या मार्गदर्शनानंतर आवश्यक मतदान साहित्यांसह नियोजित पद्धतीने मतदान केंद्रांकडे रवाना झाले. मतदान प्रक्रियेदरम्यान कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी तिसऱ्या टप्प्यातील प्रशिक्षणात मतदान कर्मचाऱ्यांना सखोल मार्गदर्शन करण्यात आले. मतदान ही प्रक्रिया नियमबद्ध, पारदर्शक व निर्भय वातावरणात पार पाडावी, मतदारांना आवश्यक ते सहकार्य द्यावे, असे आवाहन अतुल म्हेत्रे यांनी कर्मचाऱ्यांना केले.

यावेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार कल्पना ढवळे, अति. सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी प्रताप पाटील, गटशिक्षणाधिकारी बिपिन मोरे, क्षेत्रीय अधिकारी, तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मार्गदर्शनानंतर मतदान साहित्याचे वाटप करण्यात आले. कर्मचाऱ्यांनी साहित्याची तपासणी करून खात्री केली व त्यानंतर सर्व पथके मतदान केंद्रांकडे रवाना झाली. जिल्हा परिषद व पंचायत समितीची निवडणूक शांततेत, सुरळीत व यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी प्रशासन सज्ज असल्याचे चित्र यावेळी स्पष्टपणे दिसून आले.

### पथकांसोबत मेडिकल किट

निवडणूक कर्तव्यावर जाणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या आरोग्य व सुरक्षिततेला प्राधान्य देत प्रत्येक मतदान पथकासोबत मेडिकल किट देण्यात आली आहे. कोणत्या आजारासाठी कोणती गोळी वापरावी, याची माहितीही त्या बॉक्सवर नमूद करण्यात आली आहे. तसेच रात्रीच्या मुक्कामादरम्यान मच्छरांपासून संरक्षण व्हावे, यासाठी प्रत्येक टीमला मच्छर अगरबत्ती देण्यात आली आहे. मतदान केंद्राध्यक्षांनी दीड दिवस डॉक्टर बनून आपल्या टीमच्या आरोग्याची काळजी घ्यावी, असे अतुल म्हेत्रे यांनी सांगताच कर्मचाऱ्यांनी या निर्णयाचे स्वागत केले.





### मतदान यंत्रणेसाठी एसटीच्या गाड्यांचा ताफा

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांसाठी तालुक्यात तब्बल ४८६ मतदान केंद्रांवर पथकांत सहभागी अधिकारी, कर्मचाऱ्यांसह मतदान साहित्य पोहोचवण्यासाठी प्रशासनाकडून एसटी महामंडळाच्या तब्बल ६६ बसेस, १८ मिनी बस, तसेच ८ जीपची व्यवस्था करण्यात आली आहे. शिवतीर्थ दत्त चौक ते शंभूतीर्थ भेदा चौक दरम्यानच्या रस्त्यावर एसटी बसेसच्या रांगा लागल्या होत्या. तसेच पोलीस मैदानालाही बस स्थानकाचे स्वरूप प्राप्त झाल्याचे चित्र दिसून आले.

# डीएचओ मानांकनात सांगली राज्यात तिसरे

## डॉ. विजयकुमार वाघ ; आरोग्य क्षेत्रातील सुवर्णक्षण, तालुक्यांकडूनही उत्कृष्ट कामगिरी

**सांगली/प्रतिनिधी : –**

राज्य आरोग्य संसाधन यंत्रणा केंद्रामार्फत घेण्यात आलेल्या कार्यक्रमांच्या निर्देशांक उद्दिष्टांच्या पूर्ततेनुसार करण्यात येणाऱ्या डी.एच.ओ. मानांकनात सांगली जिल्हा आरोग्य अधिकारी विभागाने (डीएचओ) राज्यात तिसरा आणि कोल्हापूर विभागात पहिला क्रमांक पटकावला आहे, अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. विजयकुमार वाघ यांनी दिली.

राज्यातील जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक तसेच महानगरपालिकेचे आरोग्य अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील आरोग्य संस्थांमध्ये विविध आरोग्य कार्यक्रम राबविले जातात. या कार्यक्रमाचे निर्देशांक दरमहा जाहीर केले जातात. डिसेंबर महिन्यासाठी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. विजयकुमार वाघ यांच्या नेतृत्वाखाली सांगली जिल्ह्याने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. सांगली जिल्ह्यातील आटपाडी तालुक्याने तालुका आरोग्य अधिकारी रँकिंगमध्ये कोल्हापूर परिमंडळ कोल्हापूर विभागामध्ये प्रथम तर जत, तासगाव व वाळवा या तालुक्यांनी अनुक्रमे तिसरा व चौथा क्रमांक पटकावला आहे.

राज्यात राबविण्यात येणाऱ्या माता बाल संगोपन, आरोग्य व कुटुंब कल्याण, किशोरवयीन मुली, आर.सी.एच पोर्टल, राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रम, राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम, राष्ट्रीय आरोग्य अभियान, एकात्मिक साथरोग सर्वेक्षण, प्रशासकीय कामकाज इत्यादी राष्ट्रीय आरोग्य उपक्रमांची जिल्ह्यातील ग्रामीण आरोग्य यंत्रणेमार्फत प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली. या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे सांगली जिल्ह्याची कामगिरी लक्षणीय ठरल्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. विजयकुमार वाघ यांनी सांगितले. हे मानांकन जिल्ह्यातील सर्व अधिकारी व आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सांघिक किमगिरीमुळेच मिळाल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### आरोग्य सेवेची गुणवत्ता वाढली

जिल्ह्यातील आटपाडी तालुक्याने तालुका आरोग्य अधिकारी रैंकिंगमध्ये कोल्हापूर विभागात प्रथम स्थान मिळवले. त्याचप्रमाणे जत, तासगाव व वाळवा तालुक्यांनी अनुक्रमे तिसरा व चौथा क्रमांक पटकावला. ही कामगिरी जिल्ह्याच्या ग्रामीण आरोग्य यंत्रणेच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे फलित आहे. विविध राष्ट्रीय उपक्रम, प्रशासकीय कामकाजासह अनेक राष्ट्रीय आरोग्य उपक्रमांची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली. या उपक्रमांमुळे जिल्ह्यातील आरोग्य सेवेची गुणवत्ता वाढली असून, लोकांना चांगल्या सेवा मिळाल्या.

उत्तम प्राथमिक उपचारांसह सर्व राष्ट्रीय आरोग्य उपक्रम यशस्वीरित्या राबविण्याचा प्रयत्न आरोग्य विभागाकडून या पुढेही कायम राहणार असल्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी सांगितले. तसेच, येत्या काळात राज्यस्तरावर प्रथम क्रमांक प्राप्त करण्यासाठी अधिकाधिक गुणवत्तापूर्ण व लोकाभिमुख आरोग्य सेवा देण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला आहे.



# कवठे येथील प्रगतशील शेतकरी अतुल डेरे यांना राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार

**वाई/प्रतिनिधी:–**

इंडियन मायक्रो फर्टीलायझर यांच्या वतीने मुंबई बांद्रा येथे सहाव्या नॅशनल क्रॉप न्यूट्रिशियन समिट अँड बी टू बी एक्सपो ५ फेब्रुवारी रोजी आयोजित केला होता. सदर कार्यक्रमात कवठे कृषी क्रांती शेतकरी उत्पादक कंपनीचे अध्यक्ष अतुल मधुकर डेरे यांना इंडियन मायक्रो फर्टीलायझर मार्फत बेस्ट प्रॅक्टिसेस इन कल्टिवेशन* या फार्मर्स अवार्ड ने सन्मानित केले.

प्रगतशील शेतकरी अतुल डेअरी हे गटशेतीय सेंद्रिय शेतीतून शेतकऱ्यांना सतत मार्गदर्शन व सहकार्य करीत असतात तसेच शेतकऱ्यांच्या अनेक प्रश्न ती राज्य सरकार यांच्याकडे अभ्यासपूर्ण मानतात तसेच कवठे व परिसरातील अनेक नवीन तरुण शेतकऱ्यांना ते आधुनिक शेती करण्यासाठी प्रवृत्त करीत असतात त्यांच्या या कामाची दखल घेऊन इंडियन मायक्रोफर्टीलायझर यांच्यावतीने डॉ. पी. के. सिंघ ,डॉ. मनोरंजन मोहंती प्रदीप कोठावदे मॅनेजिंग डायरेक्टर, (अँग्री सर्च इंडिया प्रा लिमिटेड)त्यांना हा पुरस्कार दिला आहे

अतुल डेरे यांना जाहीर झालेल्या कृषी पुरस्काराबद्दल त्यांचे महाराष्ट्र राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री ना. मकरंद पाटील, खासदार नितीन पाटील कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख भूषण यादगिरवार, जिल्हा कृषी अधीक्षक भाग्यश्री फरांदे ,कवठे गावच्या सरपंच मंदाकिनी पोळ, उपसरपंच शिवाजी डेरे , ग्रामस्थ सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# सांगली जि.म.बॅंक नोकर भरती सुनावणीला तारीख पे तारीख

**सांगली/प्रतिनिधी : –**

जिल्हा बँकेतील नोकर भरतीच्या स्थगिती विरोधात बँकेने उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठात याचिका दाखल केली आहे. या प्रकरणी न्यायालयात तारीख पे तारीख सुरु असून निर्णय कधी होणार? याकडे इच्छुकांचे लक्ष आहे. आता याप्रकरणी १३ फेब्रुवारी रोजी सुनावणी होणार आहे. सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत लिपीक व शिपाईपदाच्या सुमारे ५०० जागा भरण्यात रिझर्व्ह बँक व राज्य शासनाने परवानगी दिली आहे. यानंतर बँकेने भरती



प्रक्रियेसाठी आवश्यक कारवाई पूर्ण केली केली. दरम्यान, सदरची भरती प्रक्रिया पारदर्शी व्हावी, यासाठी आ. सदाभाऊ खोत यांनी मुख्यमंत्र्यांकडे मागणी केली. मुख्यमंत्र्यांच्या आदेशानंतर सहकार विभागाने सांगली जिल्हा बँकेतील नोकर भरतीला स्थगिती देत ही भरती आयबीपीएस, टीसीएस व एमकेसीएल या कंपन्यांमार्फतच राबवण्याचे आदेश तसेच यापूर्वी जिल्हा बँकेच्या नोकर भरतीसाठी शासनाने नियुक्त केलेल्या कंपन्याचे पॅनेल रद्द करण्यात आले.

शासनाच्या नोकर भरतीच्या स्थगिती आदेशाविरोधात जिल्हा बँकेने उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठात याचिका दाखल केली आहे. दरम्यान, संबंधित कंपन्यांनीही उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर नागपूर खंडपीठाने शासनाने आदेश रद्द करत संबंधित कंपन्यांना व हितसंबंधितांना नैसर्गिक न्याय देत त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी सुनावणी घेण्याचे आदेश दिले आहे. याबाबत सहकार विभागाने समिती नेमली असून सदरची सुनावणीची प्रक्रिया सुरु आहे. दरम्यान, नोकर भरतीच्या स्थगिती विरोधात सांगली जिल्हा बँकेच्या याचिकेवर कोल्हापूर खंडपीठात काही महिन्यांपासून सुनावणी सुरु आहे.

# आंबेगाव येथे श्री संत गजानन महाराजांच्या १४८ व्या प्रकट दिन सोहळ्याचे आयोजन


**विटा /प्रतिनिधी:–**

ओम नमो गजानन महाराज चॅरिटेबल ट्रस्ट, आंबेगाव (पाचवड फाटा), विटा यांच्या वतीने श्री संत गजानन महाराज, शेगाव यांचा १४८ वा प्रकट दिन सोहळा श्रीक्षेत्र आंबेगाव, पाचवड फाटा, विटा–कराड रोड येथे भक्तिमय वातावरणात संपन्न होणार आहे. रविवार दि. ८ फेब्रुवारी २०२६ रोजी श्री संत गजानन महाराज, शेगाव यांचा १४८ वा प्रकट दिन सोहळा आयोजित केला आहे.

या पवित्र सोहळ्यानिमित्त सकाळपासून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून सर्व भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दर्शन व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.

रविवार दि. ८ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ७ ते ८ वा. – श्री महाराजांचा अभिषेक, सकाळी ८ ते १० वा. – नामगजर, सकाळी १० ते १२ वा. – कीर्तन (ह.भ.प. कैलास महाराज, नातेपुते), दुपारी १२ ते ३ वा. – महाप्रसाद असे कार्यक्रम या सोहळ्यात घेतले जाणार आहेत.

या सोहळ्यासाठी विटा परिसरातील तसेच शहरातील सर्व भक्तांनी कुटुंबासह उपस्थित राहून धार्मिक लाभ घ्यावा, असे आवाहन ओम नमो गजानन महाराज चॅरिटेबल ट्रस्ट, विटाचे ट्रस्टी यांनी केले आहे.



# सांगलीत जिल्ह्यात आज मतदान

**पान १ वरुन**

एका जागेवर उमेदवार दिला आहे. तर पंचायत समितीच्या १२२ गणात भाजपने सर्वाधिक १०४ उमेदवार रिंगणात उतरवले आहेत. राष्ट्रवादी कॉंग्रेसने ५८, शिवसेना ५०, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्ष ५५ तर कॉंग्रेसने ४९ गणात आपले उमेदवार उभे केले आहेत. तर काही ठिकाणी जनसुराज्य शक्ती, रयत क्रांती संघटना आणि शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाने उमेदवार दिले आहेत. राजकीय पक्षांनी ही निवडणूक प्रतिष्ठेची केली आहे. अनेक गट आणि गणात दुरंगी, तिरंगी लढत होत आहे. विविध प्रमुख पक्षांसह अपक्ष उमेदवारांनीही प्रत्यक्ष मतदारांच्या गाठी–भेटी घेतल्या, पदयात्रा, कोपरा सभा, बैठका घेत प्रचाराचा धडाका लावला. आपल्या उमेदवारांची भूमिका कार्यकर्त्यांनी मतदारांच्या भेटी घेत स्पष्ट केली. महिला, तरुण, शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सर्वच राजकीय पक्षांनी आवाज उठवून प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले. याशिवाय स्थानिक प्रश्न, पाणीटंचाई, आरोग्याच्या सुविधा, रस्ते, मूलभूत प्रश्न प्रचारात आघाडीवर होते.

# लोकशाही जागृत ठेवण्यासाठी समाजमन जागरूक ठेवावे

## कुलगुरू डॉ.ज्ञानदेव म्हस्के

**सातारा/प्रतिनिधी:–**

जगात ७ अब्ज लोक राहतात, प्रत्येकाला मनासारखी राज्य पद्धती मिळणे अशक्य आहे. भारताने स्वातंत्र्याचा श्वास घेतल्यानंतर, विचारपूर्वक लोकशाही पद्धतीचा स्वीकार केला. प्रजासत्ताक दिनादिवशी प्रजासत्ताकाचा, संविधानाचा उद्घोष म्हणजे स्वातंत्र्य नव्हे, तर प्रजासत्ताक उपभोगताना त्याच्या वृद्धीसाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. संविधानात दिलेल्या अधिकाराचा वापर करताना कर्तव्य व जबाबदारी पालन केले पाहिजे. आपली प्रजासत्ताक लोकशाही ही एकसंघ आहे. ही सार्वभौम आहे. व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी भारतीय लोकशाही संधी मिळवून देते. म्हणूनच लोकशाही पद्धती जागृत ठेवायची असेल तर समाजमन सतत जागरूक ठेवावे'असे विचार कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. ज्ञानदेव म्हस्के यांनी व्यक्त केले.

ते विद्यापीठाचे भाषा मंडळ व छत्रपती शिवाजी कॉलेजचा मराठी विभाग यांनी प्रजासत्ताक दिनी, संयुक्त रित्या आयोजित केलेल्या भारतीय लोकशाही अमृत महोत्सव व वंदे मातरम गीत उत्सव राष्ट्रीय निबंध स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभात बोलत होते.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.राजेंद्र मोरे होते. समारंभास इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत, विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.विजय कुंभार, भाषा मंडळाचे संचालक व उपप्राचार्य प्रा.डॉ.सुभाष वाघमारे आंतरविद्या शाखा अधिष्ठाता डॉ. आर. आर. साळुंखे, उपप्राचार्य डॉ. रामराजे माने देशमुख, स्पर्धा समन्वयक डॉ. संजयकुमार सरगडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

भारतीय लोकशाही अमृत महोत्सव व वंदे मातरम गीत उत्सव स्पर्धेच्या पारितोषिक वितरण प्रसंगी प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज व कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमांना अभिवादन करण्यात आले.

प्रास्ताविक व स्वागत समन्वयक प्रा.डॉ.संजयकुमार सरगडे यांनी केले. भाषा मंडळाचे प्रभारी संचालक डॉ.सुभाष वाघमारे यांनी स्पर्धेचा हेतू सांगून या प्रकारच्या स्पर्धा जाणीवेने विद्यापीठात आयोजित केल्याचे सांगत विद्यालयीन, महाविद्यालयीन व खुल्या गटात अशी मिळून ३६६ स्पर्धक सहभागी झाल्याचे सांगितले.

या स्पर्धेतील खुल्या गटांतील विजेते प्रकाश भोंगाळे, प्रभाकर बनसोडे, पूनम माने, महाविद्यालयीन गटात विजेते अनुराधा गायकवाड, अंजली चांदवडकर, साहिल आगरे व विद्यालयीन गटात कल्याणी घाटगे, राजनंदिनी माने, व श्रेया सुडके या ९ पारितोषिक विजेत्यांचा कुलगुरू डॉ. ज्ञानदेव म्हस्के, इंद्रजीत सावंत, प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे, डॉ. विजय कुंभार यांचे हस्ते पारितोषिके देऊन सन्मान करण्यात आला. परीक्षक प्रा.विश्वजित जाधव, प्रा. डॉ. महादेव चिंदे,विशाल कांबळे डॉ. शुभांगी कुंभार, सौ.रजनी देसाई, प्रा. श्रीकांत भोकरे, यांचाही सत्कार करण्यात आला. समन्वयक डॉ. संजयकुमार सरगडे, सहकार्य करणारे ग्रंथालय परिचर महेंद्र अष्टेकर,व सी. एस.आर फंडातून मदत केल्याबद्दल बँक ऑफ महाराष्ट्र, यांचा सन्मान करण्यात आला.

पश्चिम महाराष्ट्र पुणे विभागीय शिक्षक कॉंग्रेस समितीद्वारा, शिक्षण क्षेत्रातील कार्याबद्दल डॉ.विद्या नावडकर यांना 'नारी शक्तीचा सन्मान–२०२६ हा पुरस्कार' देण्यात आल्याबद्दल कुलगुरू डॉ. ज्ञानदेव म्हस्के यांचे हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे आभार डॉ.आबासाहेब उमाप यांनी मानले. सूत्रसंचालन डॉ.विद्या नावडकर यांनी केले. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी प्रा.डॉ. संजयकुमार सरगडे, प्रा.प्रियांका कुंभार व प्रा. श्रीकांत भोकरे, प्रथमेश बाबर, प्रथमेश म्हबळे यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमास विजेते, त्यांचे पालक, छ.शिवाजी कॉलेज मधील प्राध्यापक, इत्यादी उपस्थित होते.



भारतीय लोकशाही अमृत महोत्सव व वंदेमातरम उत्सव स्पर्धेतील पारितोषिक विजेते समवेत कुलगुरू डॉ.ज्ञानदेव म्हस्के ,डॉ.विजय कुंभार ,प्राचार्य डॉ.राजेंद्र मोरे ,प्रा.डॉ.सुभाष वाघमारे, डॉ.संजयकुमार सरगडे इत्यादी

# अभिनेता अर्जुन भिसे यांना दादासाहेब फाळके २०२५ चा उत्कृष्ट सहाय्यक अभिनेता पुरस्कार

**विटा / शिराज शिकलगार:–**

मराठी चित्रपटसृष्टीत आपली स्वतंत्र ओळख निर्माण करणारे अभिनेता अर्जुन भिसे यांना दादासाहेब फाळके चित्रपट युनियन तर्फे २०२५ चा उत्कृष्ट सहाय्यक अभिनेता पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

अर्जुन भिसे हे दादासाहेब फाळके चित्रपट युनियन, सांगली जिल्हा यांचे वाईस प्रेसिडेंट म्हणून कार्यरत असून, चित्रपटसृष्टीतील कलाकारांच्या संघटनात्मक कार्यात त्यांचा सक्रिय सहभाग आहे.

दादासाहेब फाळके चित्रपट युनियनचे अध्यक्ष अजित म्हामुनकर यांच्या मार्गदर्शनाखाली कलाकारांच्या न्याय हक्कांसाठी सातत्याने कार्य करत असून, कलाकारांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने दरवर्षीप्रमाणे यावर्षीदेखील भव्य स्वरूपात दादासाहेब फाळके पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या सोहळ्यात विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कलाकारांचा सन्मान करण्यात आला.



रितेश देशमुख निर्मित भव्य ऐतिहासिक मराठी चित्रपट राजा शिवाजी मध्ये अर्जुन भिसे यांनी साकारलेली मावळा ही भूमिका प्रेक्षकांच्या विशेष पसंतीस उतरली. त्यांच्या सशक्त आणि भावपूर्ण अभिनयाची दखल घेत यावर्षी कलाकारांमधून अर्जुन भिसे यांची उत्कृष्ट सहाय्यक अभिनेता पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. या सन्मानामुळे अर्जुन भिसे यांच्या अभिनय कारकिर्दीला नवा आयाम मिळाला असून, सांगली जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रातून त्यांच्यावर अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# हिंदी अध्यापक मंडळाचा जिल्हास्तरीय वकृत्व स्पर्धेचा निकाल जाहीर

## कन्याशाळा मलकापूरची कु.आर्या पवार शहरी विभागातून प्रथम

**मलकापूर/प्रतिनिधी:–**

माध्यमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद सातारा व सातारा जिल्हा हिंदी अध्यापक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने इयत्ता आठवीसाठी आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय वकृत्व स्पर्धेत कु.आर्या भगवानराव पवार हिने शहरी विभागातून प्रथम येण्याचा बहुमान मिळवला व कन्याशाळा मलकापूरच्या शैक्षणिक शिरपेच्यात मानाचा तुरा रोवला.

सदर स्पर्धा रविवार दिनांक २८ सप्टेंबर २०२५ रोजी संभाजीनगर सातारा या ठिकाणी राष्ट्रभाषा भवन व भारत विद्यामंदिर मध्ये आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेचा निकाल



कार्याध्यक्ष नेताजी ननावरे व कार्यवाहक अनंत यादव यांनी जाहीर केला.शहरी विभागातून ४९विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या. यामध्ये कु. आर्या पवार हिने बाजी मारली.

तिला हिंदी विषयाच्या शिक्षिका सौ.कुसुम पाटील तिचे आई वडील यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल संस्थेचे सचिव शेतीमित्र अशोकराव थोरात भाऊ, राज्य हिंदी शिक्षक महामंडळाचे अध्यक्ष ता. का. सूर्यवंशी, सचिव हणमंत सूर्यवंशी, राज्य परीक्षा मंत्री सुधाकर माने, संस्थेचे उपाध्यक्ष भास्करराव पाटील, खजिनदार तुळशीराम शिर्के, मार्गदर्शक संचालिका डॉ. सौ.स्वाती थोरात, संचालक वसंतराव चव्हाण, प्रा. संजय थोरात, सातारा जिल्हा हिंदी अध्यापक मंडळाचे पदाधिकारी, शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.सुलोचना भिसे, पर्यवेक्षिका सौ.करुणा शिर्के, वडील ग्रामसेवक भगवानराव पवार, आई सौ. जयश्री पवार, संस्था पथक प्रमुख शरदराव चव्हाण, माजी पथक प्रमुख आर. ए. कुंभार, सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थिनी व पालक यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. कु. आर्या पवार हिचे पालक वर्गातून कौतुक होत आहे.

# मिनी मंत्रालयासाठी आज मतदान

**पान १ वरुन**

हक्क बजावतील .जिल्ह्यात निवडणूक प्रक्रियेसाठी ११८२२ मतदान यंत्र तैनात करण्यात आली आहेत साताऱ्याचे जिल्हाधिकारी संतोष पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल यंत्रणेने या निर्णय प्रक्रियेचा नुकताच आढावा घेतला सातारा जिल्ह्यात अकरा लाख ८ हजार २०३ पुरुष व १० लाख ८५ हजार ८४७ महिला आणि इतर ६० अशी मतदार नोंदणी झालेली आहे .सातारा जिल्ह्यातील सातारा ३७१ कराड ४८६ पाटण ४०१ कोरेगाव २५३ वाई १८१ खंडाळा ११४ महाबळेश्वर १०९ जावळ १५४ फलटण २८२ मान २१७ व खटाव ३०९ अशी एकूण २८७ मतदान केंद्रे आहेत. जिल्ह्यातील २८७७ मतदान केंद्रांवर परिवहन महामंडळाच्या बसेस व खाजगी वाहनाने मतदान यंत्रणा तसेच कर्मचारी पुरेशा प्रशिक्षणानंतर सायंकाळी सहा नंतर उशिरा रवाना करण्यात आले .एसटी महामंडळाने या निवडणूक प्रक्रियेसाठी जिल्ह्यातून तब्बल २१८ एसटी बसेस उपलब्ध करून दिलेले आहेत .

# विद्यार्थ्यांसाठी उलगडला आयटी करिअरचा नवा रोडमॅप

## अर्चना निगडे यांचे बहुमोल मार्गदर्शन; प्रत्यक्ष प्रोजेक्ट डेव्हलपमेंटची मिळाली दिशा

**कराड/प्रतिनिधी : –**

आजच्या स्पर्धात्मक आयटी युगात केवळ पदवी नव्हे, तर कौशल्य, नवकल्पना आणि प्रत्यक्ष प्रोजेक्ट अनुभव महत्त्वाचा असल्याचे ठामपणे मांडत ऑरेंज आयटेक इन्स्टिट्यूट, पुणेच्या सीईओ, संस्थापक अर्चना निगडे यांनी विद्यार्थ्यांना करिअरचा नवा रोडमॅप दाखवला. 'करंट ट्रेंड्स इन आयटी सेक्टर अँड डेमॉन्स्ट्रेशन ऑन प्रोजेक्ट डेव्हलपमेंट' या विषयावरील त्यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांसाठी दिशादर्शक ठरले.

यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स, कराड येथील संगणक शास्त्र विभागाच्या वतीने आयोजित विशेष व्याख्यानात त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.बी. केंगार होते.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात विभागप्रमुख श्रीमती अश्विनी नलवडे यांनी, आयटी क्षेत्रातील सध्याचे ट्रेंड्स, उद्योगक्षेत्रातील प्रत्यक्ष अपेक्षा, तसेच विद्यार्थ्यांनी कोणत्या कौशल्यांवर भर द्यावा याबाबत सखोल मार्गदर्शन करत, डेमॉन्स्ट्रेशन प्रोजेक्टच्या माध्यमातून त्यांनी प्रोजेक्ट डेव्हलपमेंटची संकल्पना प्रत्यक्ष उदाहरणांसह स्पष्ट केली. त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रॅक्टिकल नॉलेजचे महत्त्व ठळकपणे जाणवले.



या व्याख्यानामुळे विद्यार्थ्यांना आयटी करिअरची योग्य दिशा मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. कार्यक्रमासाठी संस्थेचे चेअरमन बाळासाहेब पाटील, जनरल सेक्रेटरी अल्ताफहुसेन मुल्ला, तसेच विश्वस्त व सदस्य अरुण पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. आभार एस. जी. पड्याळ मॅडम यांनी मानले. सदर कार्यक्रमास संगणक शास्त्र विभागातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक, प्रेरणादायी आणि करिअरघडणीस उपयुक्त ठरल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

# चांगले विचार, आचार व आहार निरोगी जीवनाची गुरुकिल्ली

## डॉ.शिल्पा व्हावळ

**कराड/प्रतिनिधी : –**

चांगले विचार, चांगले आचार आणि समतोल आहार हीच निरोगी आयुष्याची गुरुकिल्ली जीवनाची गुरुकिल्ली आहे, असे उद्गार डॉ. शिल्पा व्हावळ काढले.

येथील सगाम महाविद्यालयात अग्रणी महाविद्यालय योजनेंतर्गत तत्वज्ञान विभागाने आयोजित केलेल्या 'मुलींच्या आरोग्य समस्या' या विषयावर आयोजित कार्यशाळेत मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्रा.डॉ. कल्पना पाटील होत्या. यावेळी उपप्राचार्य डॉ. रमेश पोळ, प्रा.डॉ. विद्या पाटील, प्रा.डॉ. कोमल कुंदप यांची प्रमुख उपस्थिती होती.

महाविद्यालयीन विद्यार्थी समाज व्यवस्थेचा अतिशय महत्त्वाचा घटक आहे. उद्याची उत्तम पिढी घडवण्याची सामर्थ्य ज्यांच्यात आहेत, त्यासाठी त्यांनी आपल्या आरोग्याची विशेष काळजी घेतली पाहिजे, असे सांगताना डॉ. व्हावळ म्हणाल्या, या वयातील मुलींना येणाऱ्या अनेक समस्यांचे विवेचन त्यांनी केले. मासिक पाळी म्हणजे काय? पाळी आल्यानंतर घ्यावयाची काळजी, शरीराची स्वच्छता, सॅनिटरी पॅड कोणते वापरावे, त्यामागची पार्श्वभूमी काय, सेनेटरी डिस्पोज कसे करावे, पॅड वापरताना मुलींनी कोणती काळजी घ्यावी इ. माहिती देत मुलींचा आहार कोणता व कसा असावा, मुलींनी



आपल्या आहारात काय खावे, हिमोग्लोन किती असावे, ते वाढवण्यासाठी कोणते पदार्थ खावेत, फास्ट फूडचे शरीरावर होणारे घातक परिणामही त्यांनी अत्यंत सोप्या शब्दात सांगितले. तसेच मुलींच्या केसांच्या समस्यांबाबतही त्यांनी अतिशय महत्त्वपूर्ण माहिती देत मुलींनी नियमित थोडा तरी व्यायाम केलाच पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

प्रा. डॉ. कल्पना पाटील यांनी, आयुष्य सुंदर आहे, ते छान जगा. त्यासाठी शरीर निरोगी ठेवा, सकारात्मक विचार ठेवा, मानसिक आरोग्य जपा, असा बहुमोल संदेश त्यांनी दिला. मुलींनी आपले मानसिक आरोग्यही जपले पाहिजे, त्यासाठी आपल्याला निरोगी शरीराची व चांगल्या विचारांची गरज असते. मानसिक क्रिया चांगली हवी, या वयात आकर्ष ही नैसर्गिक बाब असली, तरी शारीरिक आकर्षण थांबवले पाहिजे. त्यासाठी प्रत्येकाने काळजी घ्या. आपल्या समाजात मुलींपुढे लोक काय म्हणतील, हा मोठा प्रश्न असतो. त्याकडे दुर्लक्ष करा.

कार्यशाळेचे प्रास्ताविक तत्त्वज्ञान विभाग प्रमुख प्रा.डॉ. स्वाती भोंगळे, सूत्रसंचालन प्रा. कविता शेजवळकर यांनी, तर आभार प्रा. पूजा वाघमारे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी प्रा.डॉ. सुचीता औंधकर, प्रा. भाग्यश्री कदम, प्रा. अविना जाधव, प्रा. शितल सरगर, प्रा. ऐश्वर्या जाधव इ. मान्यवर उपस्थित होते.


सदर शुंभाक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारीत आहे कृपया दुरुपयोग करु नये.

**नशिबाची परीक्षा**

शनिवार ०७ फेब्रुवारी २०२६

**मिलनम डे**

उदय-अस्त सिंगल १-३-८ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| 137 / 128 / 100 | 1-9 | 126 / 180 / 270 | 12-69-03-85-97 |

**कल्याणम**

उदय-अस्त सिंगल २-४-६ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| 147 / 200 / 110 | 2-5 | 140 / 159 / 113 | 29-15-34-76-58 |

**मुंबैम ( मेन )**

उदय-अस्त सिंगल ----- मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| - | - | - | - |

दिवाळी बंपर चान्सू तयार आहे संपर्क क्रमांक मो.नं. ९९७५४७९८२६

**आज का अंदाज**

शनिवार दिनांक ०७ फेब्रुवारी २०२६

| कल्याण बाजार 'पत्थर फोड एकच' | मुंबई बाजार 'पत्थर फोड एकच' |
|---|---|
| १ - २ - ५ - ८ | ४ - ५ - ६ - ९ |
| ५६०-१५६-१४०-५६७ | १४९-१५९-१७८-४५० |
| ३८०-३९०-६९०-४४० | २४८-३५७-३५८-३७९ |
| २९०-४८०-४५६-३६९ | ३४७-४४७-२७७-२७० |
| जोडी | जोडी |
| १० - २० - ५३ - ८३ | ४३ - ५३ - ६१ - ९१ |
| १४ - २४ - ५७ - ८७ | ४७ - ५७ - ६८ - ९८ |
| १६ - २६ - ५९ - ८९ | ४० - ५० - ६२ - ९२ |

जबरदस्त पास होणारे चान्सेस दि.०७-०९ फेब्रुवारी

प्रो.बालाजी कुमार मो.नं. ९८२२४८६०३४

शनिवार दिनांक ०७ फेब्रुवारी २०२६

सर्व बाजार साठी

| | | | |
|---|---|---|---|
| ३१ | ६१ | ७२ | ०२ |
| ३५ | ६५ | ७८ | ०८ |
| ३९ | ६९ | ७४ | ०४ |
| ४९० | १२३ | २५० | २३५ |
| २२९ | २५९ | ३६८ | ३७० |
| ३०० | ४५७ | १३३ | ४६० |

प्रो.बालाजी कुमार मो.नं. ९८२२४८६०३४

# पाटण जि.प.आणि पं.स.निवडणुकीसाठी मतदान यंत्रना सज्ज

**पाटण/प्रतिनिधी:–**

पाटण जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी शुक्रवार दि. ६ रोजी बाळासाहेब देसाई महाविद्यालयाच्या हॉटेल मॅनेजमेंटच्या प्रांगणात निवडणूक कर्मचारी, अधिकाऱ्यांना निवडणूक साहित्य वाटप करण्यात आले. वाटप झालेले साहित्य घेऊन ही यंत्रणा नेमून दिलेल्या गावच्या ठिकाणी मतदान केंद्रावर हजर झाली. सकाळी ७ वा. पासून साहित्य ताब्यात घेण्यासाठी महाविद्यालयाच्या प्रांगणात निवडणूक कर्मचाऱ्यांची मोठी गर्दी झाली होती. या कर्मचाऱ्यांना नेमून दिलेल्या गावापर्यंत पोहचवण्यासाठी एस.टीसह इतर वाहनांची सोय करण्यात आली होती.

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक निर्णय अधिकारी सोपान टोम्पे व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी अनंत गुरव यांच्या नियंत्रणाखाली निवडणूक साहित्याचे वाटप करण्यात आले. निवासी नायब तहसीलदार पंडित पाटील यांची उपस्थिती होती. मतदान शांततेत पार पाडण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन सोपान टोम्पे यानी केले आहे.



१) निवडणूक साहित्य ताब्यात घेण्यासाठी झालेली गर्दी २) निवडणूक प्रक्रियेसाठी पोलिस बंदोबस्त रवाना झाला ३) निवडणूक कर्मचाऱ्यांसाठी एसटी बसेसची केलेली व्यवस्था

पाटण जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीची संपूर्ण तयारी झाली आहे. जिल्हा परिषदेच्या ७ व पंचायत समितीच्या १४ गणांसाठी शनिवार दि. ७ रोजी प्रत्यक्ष मतदान होत असून यासाठी ४०१ मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. याकामी २ हजार ४१६ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रत्येक मतदान केंद्रांवर एक पोलीस कर्मचारी नेमणूक केली असून एका ठिकाणी जास्त मतदान केंद्र असतील त्याठिकाणी एक पोलीस व इतर होमगार्ड सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे.

या निवडणुकीसाठी तालुक्यात एकूण ३ लाख ७३ हजार ५५६ मतदार असून त्यापैकी १ लाख ३८ हजार ४८१ पुरूष व १ लाख ३५ हजार ०७३ महिला मतदार व इतर २ आहेत. निवडणुकीसाठी निश्चित करण्यात आलेल्या प्रत्येक मतदान केंद्रावर केंद्राध्यक्ष, सहाययक , मतदान अधिकारी १ व २ शिपाई, पोलीस असे कर्मचारी देण्यात आले आहेत. प्रत्येक केंद्रावर जिल्हा परिषद आणि पंचायत समितीसाठी एकच मतदान यंत्र देण्यात येणार असून जिल्हा परिषद गटासाठी व पंचायत समिती गणासाठी एकाच यंत्रावर मतदान करता येणार आहे.

मतदान यंत्रणा या कामी सज्ज झाली असून मतदानाच्या आदल्या दिवशी शुक्रवार दि. ६ रोजी सर्व यंत्रणा निश्चित केलेल्या ४०१ मतदान केंद्रांवर सज्ज राहणार आहे. यासाठी ४७ एसटी बसेस, ८ स्कूल बस, ७४ खाजगी जीपगाड्या असे सर्व मिळून ११८ वाहनांची व्यवस्था करण्यात आली आहेत.

मतदान करण्यासाठी मतदान ओळखपत्राशिवाय इतर १७ पुरावे ग्राह्य धरण्यात येतील. दि. ७ रोजी मतदान प्रक्रिया पार पाडल्यानंतर सर्व मतदान यंत्रे पाटण येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुलांचे शासकीय वसतीगृहात कडेकोट बंदोबस्तात ठेवण्यात येणार आहेत. तसेच दि. ९ रोजी त्याचठिकाणी मतमोजणी प्रक्रिया व निवडणूक निकाल घोषित होणार आहे.

# प्रामाणिक कारभारासाठी अन् मराठी भाषेच्या उज्ज्वल भवितव्यासाठी रिंगणात

## प्रदीप निफाडकर ; बोगस मतदार याद्या करून निवडणुका बिनविरोध करण्याचा प्रयत्न

**कराड/प्रतिनिधी : –**

महाराष्ट्र साहित्य परिषदेचा कारभार पारदर्शक व प्रामाणिक व्हावा, तसेच मराठी भाषेच्या सर्वांगीणसंवर्धनासाठी साहित्य संवर्धन आघाडी निवडणूक रिंगणात उतरली असून, सत्ताधाऱ्यांकडून बोगस मतदार याद्या तयार करून निवडणुका बिनविरोधकरण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा गंभीर आरोप आघाडीचे उमेदवार तथा ज्येष्ठसाहित्यिक प्रदीप निफाडकर यांनी केला आहे.

कराड येथे आयोजित पत्रकार परिषदेतमाध्यमांशी संवाद साधताना निफाडकर म्हणाले की, महाराष्ट्र साहित्य परिषद ही मराठी भाषेच्या प्रसार व प्रचारासाठीकार्य करणारी एक महत्त्वपूर्ण संस्था आहे. मात्र, गेल्या काही वर्षांपासून या संस्थेचा कारभार अपारदर्शक पद्धतीनेचालवला जात असून, मतदारांना अंधारात ठेवून निवडणुकाबिनविरोध करण्याचे षड्यंत्र सत्ताधाऱ्यांकडून राबवले जात आहे.



सत्ताधारी आघाडीतीलकाही व्यक्तींनी तब्बल नऊ हजार रुपयांना मतदार यादीची विक्री केल्याची धक्कादायकमाहितीही निफाडकर यांनी यावेळी दिली. आमची लढाई ही धमकी विरुद्ध विनंतीची आहे.

सत्ताधारी दबाव आणि भीती दाखवून सत्ता टिकवण्याचा प्रयत्न करत आहेत, तर आम्ही संवाद, विश्वास आणिप्रामाणिकतेच्या बळावर मतदारांपर्यंत पोहोचत आहोत, असे त्यांनी स्पष्ट केले. मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा मिळालाअसला तरी केवळ त्यात समाधान मानून चालणार नाही, असे सांगत निफाडकर म्हणाले की, मराठी भाषेची लोकमान्यता टिकवण्यासाठी आणि ती पुढील पिढीपर्यंतपोहोचवण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्नांची गरज आहे. आज मराठी माणूस जगभर स्थायिकझाला आहे. त्यामुळे 'जेथे मराठी माणूस तेथे साहित्य परिषद' हे ध्येय ठेवून साहित्य संवर्धन आघाडी काम करणार आहे. यावेळीत्यांनी मतदार यादीतील गंभीर त्रुटींवरही प्रकाश टाकला.

परिषदेच्या मतदारांमध्ये काहीमतदारांचा मृत्यू झालेला असतानाही त्यांची नावे यादीतून कमी करण्यात आलेली नाहीत.शिवाय एकाच व्यक्तीचे नाव शहरी आणि ग्रामीण अशा दोन्ही विभागांत दाखवून मतदारयादीचे कृत्रिम विभाजन करण्यात आले आहे, असा आरोप त्यांनी केला. महाराष्ट्र साहित्य परिषदेचा कारभार खऱ्याअर्थाने साहित्यिक, वाचक आणि मराठी भाषेच्या हितासाठीव्हावा, यासाठी साहित्य संवर्धन आघाडीसातत्याने लढा देणार असल्याचेही निफाडकर यांनी यावेळी ठामपणे सांगितले.

# निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विटा पोलिसांचा गावगुंड टोळीला दणका

## विट्यातील टोळी दोन वर्षासाठी हद्दपार ;राहुल जाधव,बादल पिरजादे,अभिषेक आदाटे यांचा समावेश

**विटा / प्रतिनिधी:–**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विटा पोलीस ठाणे हद्दीतील गुन्हेगार राहुल चंद्रकांत जाधव व बादल अब्दुल पिरजादे या दोन टोळ्यांना सांगली व सातारा जिल्ह्यातून दोन वर्षासाठी हद्दपार केले असल्याचे पोलीस अधीक्षक संदीप घुगे यांनी गुन्हेगारी डोळ्यांची दहशत मोडून काढण्यासाठी ही कारवाई केली.

विटा हद्दीतील टोळीप्रमुख राहुल जाधव ( वय – ३६. रा. महात्मा गांधी शाळेजवळ साळशिंगे रस्ता, विटा.), सदस्य – सागर भानुदास चोथे ( वय – ३७. रा. लेंगरे रोड विटा.), अभिषेक चंद्रकांत आदाटे ( वय – ३० रा. विटा बस स्थानक मागे, विटा.), सुनील अनिल पवार ( वय – २६. रा. लेंगरे तालुका खानापूर) या टोळी विरुद्ध २०१५ ते २०२५ या कालावधीत जबरदस्तीने पळवून नेणे, ट्रॉसिटी, इच्छापूर्वक जबर दुखापत करणे,



जीव मारण्याची धमकी देणे, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणे, बेकायदा जमाव जमवून घराचे नुकसान करणे, खासगी सावकारी, आत्महत्यास कारणीभूत, हद्दपारी आदेशाचा भंग, खंडणी घातक शस्त्र बाळगणे, कट रचून खुनाचा प्रयत्न करणे अशी गुन्ह्याची मालिकाच दाखल आहे.

राहुल जाधव टोळीने परिसरात दहशत निर्माण केली होती. कायद्याला जुमानत नसल्यामुळे विटा पोलिसांनी टोळी विरुद्ध हद्दपारीचा प्रस्ताव सांगली जिल्हा पोलीस अधीक्षक संदीप घुगे यांना सादर केला होता. विटा शहरातील या हद्दीतील दुसऱ्या टोळीचा प्रमुख बादल अब्दुल पिरजादे ( वय – ३२. रा. बर्वे मळा विटा.), प्रीतम सदाशिव शिंदे. ( वय – २१ रा. पारे. तालुका खानापूर) या टोळी विरुद्ध २०२५ मध्ये दुचाकी चोरी, आरोग्यास अपायकारक, औषधी द्रव्य विक्री करणे असे गुन्हे दाखल आहेत. टोळी विरुद्ध विटा पोलिसांनी हद्दपारीचा प्रस्ताव बनवला होता. पोलीस अधीक्षक संदीप घुगे यांनी दोन्ही टोळ्यांचा प्रस्तावाचे अवलोकन करून विटा उपविभागीय पोलीस अधिकारी विपूल पाटील यांच्याकडे चौकशीसाठी प्रस्ताव पाठवला.

विटा उपभागीय पोलीस अधिकारी विपूल पाटील यांनी पाठवलेल्या अहवालानंतर अधीक्षक संदीप घुगे यांनी सलग सुनावणी घेऊन सहा जणांना सांगली व सातारा जिल्ह्यातून दोन वर्षासाठी हद्दपार केले. तसेच आणखी टोळ्या रडावर आगामी काळात देखील आणखीन काही टोळ्यांवर करडी नजर ठेवून कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# जि.प.,प.स.निवडणूक ;मतदानासाठी पथके मतदान साहित्यांसह रवाना

**पंढरपूर /प्रतिनिधी:–**

पंढरपूर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ०८ गटासाठी व त्याअंतर्गत पंचायत समितीच्या १६ गणासाठी शनिवार दि.०७ फेब्रुवारी २०२६ रोजी ३०९ मतदान केंद्रावर मतदान होणार असून, मतदारांना सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदानाचा हक्क बजावता येईल. तालुक्यात या मतदान केंद्रासाठी ईव्हीएम मशीन व मतदानासाठी लागणारे आवश्यक साहित्य, साधनसामुग्रीचे वितरण मतदान चमूंना आज वितरीत करण्यात आले असून मतदान पथके मतदानस्थळी रवाना झाली आहेत. अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी सचिन इथापे यांनी दिली.

मतदान पथके शासकीय धान्य गोदाम, पंढरपूर येथून मतदान केंद्रावर रवाना करण्यात आले असून मतदान पथकांचे परिवहन व्यवस्थेकरीता ४२ एस.टी. बसेस, ०५ जीप तसेच क्षेत्रीय अधिकारी यांच्यासाठी ३२ वाहने वापरण्यात येणार आहेत. मतदानाची प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यात आले आहे. तसेच कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने पोलिस प्रशासनामार्फत आवश्यक प्रमाणात पोलीस बल तैनात ठेवण्यात आले आहे.

मतदान केंद्रातील आवश्यक सुविधा व सुरक्षिततेच्या दृष्टीने सर्व यंत्रणेतील अधिकारी, कर्मचारी यांना प्रशिक्षण देऊन तत्पर राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. निवडणूक प्रक्रिया निर्भय, नि:ष्पक्ष आणि शांततापूर्ण वातावरणात पार पाडण्यासाठी निवडणूक यंत्रणा सज्ज झाली आहे. तालुक्यातील सर्व मतदारांनी लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी मतदान प्रक्रियेमध्ये



उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन आपला मतदानाचा हक्क बजवावा, असेही आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी श्री इथापे यांनी केले आहे.

# विट्यात गुन्हेगारी, नशेखोरी रोखण्यासाठी पोलीस निरीक्षक धनंजय फडतरे रस्त्यावर

## विटा भाजी मंडईत नशेखोऱ्यांना दिला चोप

**विटा / प्रतिनिधी:–**

सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्यातील विटा शहरातील विटा – मायणी रोड, नवीन भाजी मंडई या ठिकाणी मंगळवार व बुधवारी रात्री काही अज्ञात नशेखोरांनी व काही गुन्हागार वृत्तीचे लोकांनी विनाकारण काही लोकांना नाहक त्रास देणे, मारहाण करणे असे कृत्य केल्याने विटा शहरात अशा टोळ्यांचा धुमाकूळ सुरू आहे. या संदर्भात विटा उपविभागीय पोलीस अधिकारी विपूल पाटील यांच्या आदेशानुसार विटा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय फडतरे यांनी तातडीने दक्षता घेत शहरात सार्वजनिक ठिकाणी नशेखोरी, गुंडागिरीसह भाईगिरी करणाऱ्या अशा फाळकुट दादांचा चांगलाच समाचार घेत गुन्हेगारी, नशेखोरी रोखण्यासाठी विटा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय फडतरे हे रस्त्यावर उतरले आहेत.

या पार्श्वभूमीवर विटा पोलीस ठाणेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक जालिंदर पळे सह



विटा पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अंमलदार यांनी सकाळ, दुपार, सायंकाळ आणि मध्यरात्री गस्त सुरू केली आहे. रात्रीच्या वेळेत शहरी भागात अशा टोळक्यांवर पोलिसांनी करडी नजर ठेवली आहे. विनाकारण जर कोणी असे त्रास नागरिकांना देत असेल किंवा आढळल्यास विटा पोलीस प्रथम संशयितास खाक्या दाखवत धडक कारवाई करीत आहेत. तर काही ठिकाणी विटा भाजी मंडईमध्ये आडोशाला मद्य प्राशन करणाऱ्यांना जागेवरच चोप दिला. तर काही गावगुंड तरुणांना चांगलीच समज दिल्याचे दिसून येत आहे. नेहमी विटा भाजी मंडईमध्ये व अन्य ठिकाणी बसणारे हे तळीराम गायब झाले आहेत. त्यामुळे भाजी मंडई ने मोकळा श्वास घेतला आहे.

# सांगलीत आता स्थायी समिती सदस्यपदासाठी मोर्चेबांधणी

## सभापतीपदी आ.सुधीर गाडगीळ समर्थकाची वर्णी लागण्याची शक्यता

**सांगली/प्रतिनिधी : –**

सांगली महापालिकेतील महापौर व उपमहापौर पदाच्या निवडीची आता औपचारिकता राहिली आहे. या दोन्ही निवडी बिनविरोध झाल्या असून त्यांची अधिकृत घोषणा बाकी आहे. मात्र आता नूतन नगरसेवकांना स्थायी समिती सभापती व सदस्य पदाचे वेध लागले आहेत. यासाठी इच्छुकांनी मोर्चेबांधणी सुरु केली आहे. स्थायी समितीच्या सभापती पदी आ. सुधीर गाडगीळ यांच्या समर्थकांची वणी लागण्याची शक्यता आहे.

महापालिकेच्या तिजोरीच्या चाव्या स्थायी समिती सभापतीच्या ताब्यात असल्याचे मानले जाते. यामुळे स्थायी समिती सभापती व सदस्यपदी वर्णी लागण्यासाठी मोठी रस्सीखेच असते. स्थायी समितीत १६ सदस्य असून बहुमतासाठी ९ सदस्यांची गरज आहे. भाजप व



राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाची युती झाली आहे. यामुळे स्थायी समितीत युतीचे संख्याबळ ११ होते. स्थायी समितीत १६ सदस्यांपैकी भाजपचा सदस्य कोटा ८ आहे. काँग्रेसचा ४, राष्ट्रवादी अजित पवार पक्षाचा ३, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचा १ सदस्य कोटा आहे.

महापालिकेत भाजपचे ३९ नगरसेवक आहेत. यापैकी कोणत्या ८ सदस्यांना स्थायी समितीत संधी मिळणार, याकडे लक्ष लागले आहे. काँग्रेसच्या १८ नगरसेवकांमधून कोणत्या नगरसेवकांची स्थायी समितीवर वर्णी लागणार, राष्ट्रवादी अजित पवार पक्षाच्या १६ नगरसेवकांमधून ३ तर राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या ३ नगरसेवकांमधून १ सदस्य स्थायी समितीवर जाणार आहे. स्थायी समितीवर सदस्य म्हणून जाण्यासाठी भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी, राष्ट्रवादी शरद पवार पक्षातील नगरसेवकांची नेत्यांकडे मोर्चेबांधणी सुरू झाली आहे.

शहरातील भाजपमध्ये मोठी गटबाजी आहे. महापालिका निवडणूक दरम्यान ती उफाळूनही आली होती. याचा परिणाम काहीसा पक्षाच्या कामगिरीवरही झाला आहे. आता महापालिकेत पद वाटपातही प्रत्येक गटाचा विचार होणार का? याकडे लक्ष आहे. भाजपने गटनेतेपदी संदीप आवटी यांची निवड केली आहे. आवटी हे आ. सुरेश खाडे यांचे समर्थक आहेत. महापौरपदी धीरज सूर्यवंशी यांना संधी दिली आहे. सूर्यवंशी हे पालकमंत्री चंद्रकांत पाटील व प्रदेश उपाध्यक्ष शेखर इनामदार यांचे समर्थक आहेत. आता स्थायी समिती सभापती पदासाठी आ. सुधीर गाडगीळ यांच्या समर्थक नगरसवेकांची वर्णी लागण्याची शक्यता पक्षातून व्यक्त होत आहे.

### महिला–बाल व समाजकल्याण सभापतीसाठीही फिल्डींग

महापालिकेत चार प्रभाग समिती सभापती व समाजकल्याण आणि महिला बालकल्याण समिती सभापतींच्याही निवडी होणार आहेत. यासाठीही इच्छुकांनी मोर्चेबांधणी केली आहे. त्यातही समाजकल्याण समिती सभापतीपदासाठी मोठी रस्सीखेच आहे. या समितीसाठी महापालिका व जिल्हा नियोजन समितीतून मोठा निधी विकासकामांसाठी येतो. हे महत्वाचे पद भाजप स्वत: ठेवणार की महायुतीतील घटक पक्षाला देणार? तसेच महिला बालकल्याण सभापती कोण होणार? याची उत्सुकता आहे.

# पंढरपूरातील दोन सराईत गुन्हेगार जिल्हयातून हददपार

**पंढरपूर/ प्रतिनिधी:–**

पंढरपूर शहर पोलीस ठाणे हददीतील शरीराविषयी गुन्हेगारी करणाऱ्या टोळी मधील सराईत गुन्हेगार नामे १) आदित्य रामचंद्र छापछडी रा.सेंट्रल नाका,पंढरपुर ता. पंढरपुर जि. सोलापुर २) सुरज अनिल ननवरे रा. रा.सेंट्रल नाका, पंढरपुर ता.पंढरपुर जिल्हा सोलापुर (टोळी सदस्य) यांचेविरूध्द वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंढरपुर शहर पोलीस ठाणे यांनी वरील टोळीतील ०२ हददपार इसमांवर महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५५ प्रमाणे तडीपारीचा प्रस्ताव तयार करून हददपारीचे कारवाईबाबत मा.पोलीस अधिक्षक सो. सोलापुर ग्रामीण यांना अहवाल सादर केला होता.

सहा. पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे उपविभागीय पोलीस अधिकारी पंढरपुर उपविभाग, पंढरपुर यांनी सदर



हददपार करणेच्या संदर्भातील काम चालवुन सदरबाबतचा सविस्तर अहवाल अतुल कुलकर्णी सो, पोलीस अधिक्षक सोलापुर ग्रामीण यांचेकडे सादर केला होता त्या अनुशंगाने १) आदित्य रामचंद्र छापछडी रा. सेंट्रल नाका, पंढरपुर ता. पंढरपुर जि. सोलापुर २) सुरज अनिल ननवरे रा. रा. सेंट्रल नाका, पंढरपुर ता.पंढरपुर जिल्हा सोलापुर (टोळी सदस्य) यांना ०६ महिने कालावधीकरीता संपुर्ण सोलापूर जिल्हयातुन हददपार करण्यात आले असून सदरची नोटीस ही हददपार इसम यांना ताब्यात घेवून बजावण्यात आली आहे.तसेच पंढरपुर शहरातील इतर सराईत गुन्हेगारांवर कठोर परिणामकारक प्रतिबंधक कारवाई करणेचे कामकाज सुरू आहे.

सदरची कामगीरी ही अतुल कुलकर्णी (भा.पो.से) पोलीस अधिक्षक सोलापुर ग्रामीण, प्रितमकुमार यावलकर, अप्पर पोलीस अधिक्षक सोलापुर ग्रामीण, प्रशांत डगळे सो(भा.पो.से) सहा.पोलीस अधिक्षक पंढरपूर विभाग, पंढरपूर व दशरथ वाघमोडे पोलीस निरीक्षक, पंढरपूर शहर पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण षाखेचे सपोनि आशिष कांबळे, सपोफौ. कल्याण ढवणे, पोलीस नाईक सचिन इंगळे, पोहवा गणेश पवार, पोकॉ शहाजी मंडले, दिपक नवले तसेच स्थानिक गुन्हे शाखा,सोलापुर ग्रामीणचे अनिस शेख, रतन जाधव यांनी केली आहे.

# पाणी पुरवठा पाइपलाईन कामानंतर रस्त्यावर निकृष्ट कॉँक्रीटचा ढिगारा

## मंगळवार पेठ परिसरातील स्थिती ; नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर

**कराड/प्रतिनिधी : –**

शहरातील मंगळवार पेठ परिसरात पाणीपुरवठा विभागाच्या मोठ्या पाइपलाईनच्या कामानंतर रस्त्यावर निकृष्ट दर्जाचे काँक्रीट टाकण्यात आल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. कराड नगरपालिकेच्या हद्दीतील मंगळवार पेठ, कन्या शाळा, जोतिबा मंदिर मुख्य मार्गावरील पाटील हाइट्स बिल्डिंग ते चौक या परिसरात ही स्थिती निर्माण झाली आहे. याप्रश्नी प्रमोद पाटील यांनी मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देत नागरिकांची गैरसोय आणि संभाव्य अपघात टाळण्यासाठी तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

पाणीपुरवठ्याच्या पाइपलाईनसाठी करण्यात आलेल्या खोदकामानंतर खड्डे नीट भरून न काढता निकृष्ट काँक्रीट वापरले गेल्याने रस्त्यावर मोठ्या प्रमाणात काँक्रीटचे तुकडे पसरले आहेत. यामुळे वाहनचालक, पादचारी, ज्येष्ठ नागरिक तसेच शालेय विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

विशेषत: शाळेत ये-जा करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा रस्ता धोकादायक ठरत असून, आतापर्यंत काही नागरिकांना किरकोळ दुखापती झाल्याच्या घटना घडल्या आहेत. भविष्यात गंभीर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही, अशी भीती स्थानिक नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

या पार्श्वभूमीवर मंगळवार पेठ परिसरातील रहिवासी तथा दक्ष



कराडकर प्रमोद पाटील यांनी कराड नगरपालिकेचे मुख्याधिकारी प्रशांत व्हटकर यांच्याकडे लेखी निवेदन सादर करून तातडीने लक्ष देण्याची मागणी केली आहे. संबंधित ठिकाणी निकृष्ट काँक्रीट काढून टाकून दर्जेदार काँक्रीटने रस्ता पूर्ववत करावा. तसेच नागरिकांची गैरसोय आणि संभाव्य अपघात टाळण्यासाठी तात्काळ उपाययोजना कराव्यात, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. पालिका प्रशासनाने या प्रकरणी तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा स्थानिक नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# महापौर, उपमहापौर निवडीने नगरसेवकांची गोवा सहल रद्द

## अनेकांत नाराजी: प्रवासासाठी भरलेल्या बॅगा केल्या रिकाम्या

**सांगली/प्रतिनिधी : –**

सांगली महापालिकेत महापौर व उपमहापौर निवडी बिनविरोध झाल्या आहेत. यामुळे अनेक नगरसेवकांची सहल रद्द झाली आहे. सदरची सहल गोवा येथे जाणार होती. तेथील पंचतारांकित हॉटेलमधील पाहुणचार व सहलीचा आनंद घेता येणार नसल्याने पालिकेच्या काही नगरसेवकांत नाराजी दिसत आहे. अनेकांनी या सहलीसाठी बॅगाही भरल्या होत्या. ऐनवेळी सहल रद्द करावी लागल्याने त्यांचा हिरमोड झाला आहे.

सांगली महापालिकेत भाजपला काठावरचे बहुमत मिळाले आहे. यामुळे पालिकेत महायुतीतील घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादी अजित पवार पक्षासोबत युती करून सत्ता स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. यासाठी सत्ता वाटपात महापौरपद भाजपकडे तर, उपमहापौरपद राष्ट्रवादीकडे गेले. महापौर पदासाठी धीरज सूर्यवंशी तर उपमहापौरपदासाठी गजानन मगदूम यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. सदरचे अर्ज दाखल झाल्यानंतर भाजप व




राष्ट्रवादीच्या नूतन नगरसेवकांना सहलीसाठी पाठवण्यात येणार होते तसे निरोप दोन्ही पक्षाच्या नगरसेवकांना देण्यात आले होते. त्यांना प्रवासासाठी बॅगा भरण्यास सांगण्यात आले होते. ही सहल गोवा येथे जाणार होती. गोवा येथील पंचातारांकित हॉटेलमधील पाहुणचार व सहलीचा आनंद मिळणार म्हणून अनेक नगरसवेक खुश होते. यात बहुतांशी पुरुष नगरसेवक होते. बॅगा भरून ते प्रवासाच्या तयारीतही होते.

दरम्यान, महपालिकेत दोन नंबरचा पक्ष असलेल्या कॉंग्रेस पक्षाने महापौर, उपमहापौर पदाची निवडणूक न लढता भाजप व राष्ट्रवादीला बाय दिला. यामुळे महापौरपदी भाजपचे धीरज सुर्यवंशी व उपमहापौरपदी राष्ट्रवादीचे गजानन मगदूम बिनविरोध झाले. यानंतर आता महापौर, उपमहापौर निवडीची केवळ औपचारीकता राहिली असून याची अधिकृत घोषणा १० फेब्रुवारीला विशेष सभेत होणार आहे. बिनविरोध निवडीमुळे नगरसेवक फुटीची किंवा निवडीवेळी गडबड होण्याची शक्यता नसल्याने दोन्ही पक्षाच्या नगरसवेकांची नियोजीत सहल रद्द करण्यात आली. यामुळे अनेकांचा हिरमोड झाला असून नाराजी पसरली आहे.

# निवडणूक निरीक्षक सुषमा सातपुते यांची निवडणूक कार्यालयास भेट

**कराड/प्रतिनिधी:–**

जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या अनुषंगाने मतदान प्रक्रिया निर्भय, मुक्त, निष्पक्ष व कायदेशीर वातावरणात पार पडावी, या उद्देशाने आज निवडणूक निरीक्षक (ऑब्झर्वर) सुषमा सातपुते यांनी कराड येथील धान्य गोदाम परिसरात असलेल्या निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयास भेट देऊन सखोल पाहणी केली.

यावेळी त्यांनी निवडणुकीसंदर्भात राबविण्यात आलेल्या विविध उपाययोजना, स्ट्रॉंग रूमची सुरक्षितता तसेच मतमोजणी व्यवस्थापनाबाबत सविस्तर माहिती घेतली. निवडणूक प्रक्रियेतील प्रत्येक टप्पा नियमांनुसार व पारदर्शक पद्धतीने राबविला जात असल्याची खातरजमा



त्यांनी केली.

यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रांताधिकारी अतुल म्हेत्रे व व्यवस्थापन विभाग प्रमुख अक्षय सपाटे यांनी निवडणूक तयारीबाबत सविस्तर माहिती दिली. यामध्ये मतदानासाठी रवाना झालेल्या कर्मचाऱ्यांची एकूण संख्या, मतदानाच्या दिवशीची संपूर्ण व्यवस्था व तयारी, केंद्राध्यक्ष व सर्व संबंधित कर्मचाऱ्यांना देण्यात आलेल्या आवश्यक सूचना यांचा समावेश होता.

तसेच मतमोजणी प्रक्रियेबाबत माहिती देताना २४ टेबलवर ईव्हीएमद्वारे मतमोजणीसाठी पूर्ण तयारी केली असून, १२ टेबलवर टपाली मतपत्रिकांची मोजणी करण्याची व्यवस्था करण्यात आल्याचे सांगण्यात आले. याशिवाय पत्रकार व पोलीस कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था तसेच इतर आवश्यक सोयी-सुविधांचीही माहिती देण्यात आली.

संपूर्ण व्यवस्था समाधानकारक असल्याचे नमूद करत निवडणूक निरीक्षक सुषमा सातपुते यांनी प्रशासनाच्या तयारीबाबत समाधान व्यक्त केले.

या पाहणीवेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार कल्पना ढवळे, अति.सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा गटविकास अधिकारी प्रताप पाटील, नायब तहसीलदार महेश उबारे, विश्वजीतसिंह राजपूत, बाबुराव राठोड, सहाय्यक अभियंता श्वेता राजेंद्र जाधव, सुरज शिंदे व श्रेयस पाटील आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.